# एक अद्भुत नाटक

— अनुवादक —
रामचंद्र पाडुरंग सांबे

केरळमध्यें कान्हन गड येथें आनंदाश्रम नांवाचा एक मठ आहे. या मठांतील स्वामी रामदास यांची महान् साक्षात्कारी संत म्हणून आज जगभर ख्याति पसरली आहे. 'इन् दि व्हिजन् ऑफ गॉड' या त्यांच्या एका ग्रंथांत त्यांनीं आपल्या भारत-भ्रमणांतील अनेक अनुभव वर्णन केले आहेत. त्या ग्रंथांत वर्णिलेला एक मनोवेधक प्रसंग येथें दिला आहे. स्वामी रामदास हे स्वतःसंबंधीं बोलतांना नेहमीं तृतीयपुरुषीच उल्लेख करतात. खालील प्रसंगांत निर्देश असलेला रामचरणदास हा साधक भक्त कांहीं वर्षे स्वामी रामदास यांच्यावरोबर होता. आकर्षक शैली आणि वर्ण्य प्रसंग हुबेहुब डोळ्यासमोर उभा करण्याची हातोटी यांमुळें पुढील हकीकत वाचकांना आवडेलच. शिवाय त्यांत अखेर सांगितलेला विचारहि साधकांना मननीय वाटेल....

एके दिवशीं संध्याकाळीं रामचरणदासापाशीं बोलत असतांना आसक्ति व स्वामित्व या भावनांविषयीं रामदासानें विवेचन केलें. 'कोणत्यांहि गोष्टीविषयींची आसक्ति हें भीति व काळजी यांचें मूळ असतें. यामुळें शांतीचा नाश होतो. स्वामित्वाच्या भावनेनें मनाची अस्वस्थता राहाते व त्यायोगें स्वतःच्या केवल स्वरूप सत्यावर आपलें मन एकाग्र होऊं शकत नाहीं. तेव्हां तुझ्याजवळ असलेल्या वस्तूंविषयींची आसक्ति तूं सोडून दे. वस्तू जवळ ठेवावयाला हरकत नाहीं पण त्यांविषयीं स्वामित्वाची भावना बाळगूं नको. जेव्हां तुला भेट म्हणून कांहीं वस्तू मिळतील तेव्हां त्या परमेश्वरानेंच दिल्या आहेत असें समजून त्यांचा स्वीकार कर आणि वेळ येईल तेव्हां त्या दुसऱ्याला देतांना, तुला त्या घ्यावयाच्या वेळीं झाला होता तेवढ्या आनंदानें त्या देण्यास कचरूं नको. ज्यानें ज्यानें त्या तुला दिल्या त्यालाच तूं त्या वस्तु परत करीत आहेस हें लक्षांत ठेव. याच दृष्टीनें मिळणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा तूं विचार कर. परमेश्वर देतो आणि तोच परत काढूनहि घेतो.

दुसरे दिवशीं दुपारीं रामचरणदास म्हणाला,

'स्वामीजी, कानडी भाषेतील कांहीं धार्मिक पुस्तकें मला घ्यावीशीं वाटतात. त्यासाठीं मी जरा गांवांत जाऊन येतों.'

'ठीक आहे राम' रामदास उत्तरला, 'पण लवकर परत ये. आणि रात्रीचा बाहेर राहूं नको.'

रामचरणदासाजवळ कांहीं पैसे शिल्लक होते. ते त्यानें भवानीशंकररावाच्या आई-जवळ ठेवावयाला दिले आहेत, हें रामदासाला माहित होतें. मल्लेश्वरम्‌पासून दोन मैल लांब असलेल्या बंगलोर शहरांत रामचरणदास गेला. परत येतांना मल्लेश्वरम्‌च्या रस्त्यावर दोन साधू त्याला भेटले. आपल्याला सकाळपासून कांहीं एक खावयास न मिळाल्याचें त्यांनीं रामचरणदासाला सांगितले आणि एक चार–आठ आणे दिल्यास आपल्यावर मोठे उपकार होतील असें ते त्याला म्हणाले. बाजारांत जाण्यापूर्वी रामचरणदासानें घेतलेले सर्व पैसे संपून गेले होते, परंतु भवानीशंकररावाच्या आईजवळ त्याचे अजून कांहीं पैसे शिल्लक होते. तेव्हां आपल्याबरोबर आल्यास पैसे देण्याचें त्यानें त्या दोघा साधूंना आश्वासन दिलें.

'पहिल्या प्रथम येथेंच जवळ राहणाऱ्या एका महान् सत्पुरूषाचें आपण दर्शन घेतल्यास फार चांगलें!' त्यानें सुचविले. 'मी आपणांला त्यांचें दर्शन करवून देतों. आणि मग पैसे देण्याची व्यवस्था करतों.'

त्या साधूंनीं याला संमति दिल्यावर त्यांच्यासह तो तसाच रामदासाकडे आला व म्हणाला,

'स्वामीजी, आपल्या दर्शनाला मी या दोघा साधूंना घेऊन आलों आहें.' असें म्हणून मोठ्या आनंदानें तो हात जोडूं लागला!

'फार चांगलें, राम।' रामदास उतरला.

साधूंनीं खोलींत प्रवेश केला. आपल्या जवळ पसरलेल्या कांबळ्यावर बसण्याची रामदासानें त्यांना विनंति केली. त्यांच्या वयावरून त्यांच्यापैकीं एक गुरु व दुसरा त्याचा शिष्य असावा असें दिसलें. त्यांच्यापैकीं मोठा मध्यम वयस्क, काळसर वर्णाचा व शरीरप्रकृतीनें बळकट होता. तो पुढें आला व रामदासाजवळ घोंगडी-वर बसला. दुसरा तरुण इसम कांहीं अंतरावर विनयपूर्वक बसला. रामचरण-दास आपल्या नेहमींच्या जागेवर बसला.

रामदासाजवळ बसलेल्या साधूंचें लक्षपूर्वक अवलोकन केल्यावर अधिक गोष्टी दिसून आल्या. त्याला आंखूड, दाट व काळी कुळकुळीत दाढी होती. डोक्यावरील केस दाट असून ते नीट विंचरलेले होते व ते खांद्यापाशीं कापलेले होते व खांद्यावर रुळत होते. त्याचा चेहरा मर्दानी असून मुद्रा कणखर व उग्रट होती. आपल्या अंगांत त्यानें एक घट्ट बंडी घातली होती त्याच्या गळ्यामोंवतीं एक जाड लाल दोरा असून त्यांत एकच रुद्राक्षाचा मणी होता. तसेंच त्याच्या खांद्यावर दोरीला एक छोटी बाटली होती. त्याच्या मनगटांत लोखंडी कडीं होतीं. ज्या विशिष्ट तऱ्हेनें तो शब्दोच्चार करीत होता त्यावरून तो तामीळ नाडचा रहि-वाशी असल्याचें दिसून येत होतें.

## अंक १ ला

त्या साधूनें रामचरणदासाला आपल्या-कडे बोलावून म्हटले, 'एक वाळलेली गवताची काडी घे पाहूं!'

रामचरणदास बाहेर गेला व त्या साधूला हवी असलेली गवताची काडी घेऊन परत आला. त्या साधूनें ती आपल्या हातांत घेऊन बोटानें तिचे बारीक बारीक तुकडे केले आणि रामचरणदासाला तोंड उघडण्यास सांगितले. त्यानें तसें केल्यावर साधूनें ते गवताचे तुकडे त्याच्या उघडलेल्या तोंडांत टाकले. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या तुकड्याचें तावडतोब लवंगांत रुपांतर झालें !

'आतां मला थोडी माती आणून दे.' त्या साधूनें पुन्हां सांगितले.

रामचरणदासानें तावडतोब थोडी माती आणून त्या साधूच्या हातांत दिली. एक बचकाभर माती घेऊन त्यानें पुन्हा रामचरणदासाला आपलें तोंड उघडण्यास सांगितलें. त्यानें तसें केल्यावर त्या साधूनें ती माती त्याच्या तोंडांत घातली पण रामचणदासाला ती खडीसाखरेप्रमाणें गोड लागली. मोठ्या हर्षानें तोंडांतला साखरेचा खडा तो दाखवूं लागला ! पण त्याचा तो आनंद अल्पजीवी ठरला हें पुढील प्रसंगावरून दिसून येईल.

हे जादूचे प्रयोग झाल्यावर तो साधू रामदासाकडे वळून म्हणाला, 'तुम्ही बरेच क्षीण झालेले दिसतां. माझ्याकडे पहा. मी कसा बळकट व निरोगी आहे तो. माझ्यासारखेंच तुम्हीहि बनावें अशी माझी इच्छा आहे. मी तुम्हाला बळकट आणि उत्साही बनवूं शकेन काय ? तुमचें काय म्हणणे आहे यावर ?'

'महाराज,' रामदास हात जोडून म्हणाला, 'सध्या आहे त्या शारीरिक अवस्थेंत रामदास पूर्ण समाधानी आहे. परमेश्वरानेंच त्याला असा बनविला आहे आणि त्याला दुसऱ्या कशाचीहि इच्छा नाहीं.'

'नाहीं ! असें नाहीं !' तो साधू मध्येंच उद्गारला, 'तुम्ही लठ्ठ झालेंच पाहिजे. आतां आहांत तसें राहून मुळींच उपयोगी नाहीं.' असें म्हणत आपल्या गळ्यापासून एका दोऱ्याला लोंबत असलेली एक छोटीशी बाटली त्यानें काढली आणि त्यांतून एक चिमुटभर राख आपल्या तळहातावर ओतून हुकुमी स्वरानें तो रामदासाला म्हणाला,

'ठीक ! तुमचें तोंड उघडा पाहूं !'

रामदासाला तसें करण्यावाचून गत्यंतरच राहिलें नाहीं. त्यानें आपलें तोंड उघडल्यावर त्या साधूनें चटकन ती राख त्याच्या तोंडांत टाकली.

'गिळून टाका ती !' दुसरी आज्ञा झाली. रामदासानें तसें केलें.

'तुमच्या शरीराचें बळकट शरीरांत रुपांतर करण्याचें सामर्थ्य या राखेंत आहे.' त्या साधूनें आश्वासन दिलें व बाटली परत पूर्वीच्या जागीं ठेवून दिली. यानंतर वरील नाटकाच्या दुसऱ्या अंकास प्रारंभ झाला.

## अंक २ रा

थंडी अतिशय पडली होती. त्यामुळें रामदासाला आपल्या शरीराभोंवतीं एक घोंगडी पांघरून घ्यावी लागली होती. त्याशिवाय त्यानें लोकरीची टोपीहि घातली होती. त्या साधूनें ती टोपी मागितली. रामदासानें आपल्या डोक्याची टोपी काढून त्याला दिली. ती त्या साधूनें आपल्या डोक्यावर बसविण्याचा

प्रयत्न केला. पण ती अगदींच लहान असल्याचें त्याला आढळलें. त्यामुळें त्याच्यां डोक्याला ती टोपी बसेना. 'कांहीं उपयोग नाहीं याचा.' असें म्हणून त्यानें ती रामदासाला परत दिली.

त्यानंतर त्यानें रामदासानें पांघरलेली शेगडी मागितली रामदासानें ताबडतोब ती त्याला दिली. लक्षपूर्वक पाहिल्यावर ती त्या साधूला जाड व खरखरीत आहे इतकेंच नव्हे तर आकारानेंहि अवजड असल्याचें आढळलें. त्यानें ती परत फेंकली. त्यानंतर त्या साधूची दृष्टी व्याघ्राजिनावर स्थिरावली, व बोटानें त्याचा नरमपणा तो अजमावूं लागला. त्याबरोबर रामचरणदासाच्या चेहऱ्यावर अस्वस्थतेची छटा दिसूं लागली.

'हें मोठें सुंदर कातडें आहे.' तो साधु म्हणाला. 'मला नीट पाहूं द्या बरें!'

रामदास उठून उभा राहिला व त्यानें त्या साधूला ते व्याघ्राजिन घेऊं दिलें. साधूच्या चेहऱ्यावर संतोषदर्शक हास्य विलसूं लागलें.

'हें पहा!' त्या साधूनें आपल्या चेल्याला म्हटलें. 'तुझ्या खांद्यावर टाक तें! हलकें व अगदीं मऊ आहे तें!'

रामचरणदासाची मुद्रा मात्र आतां पाहण्यासारखी झाली. त्याचा चेहरा कमालीचा फिक्कट पडला. नंतर त्या साधूची दृष्टी रामचरणदासाकडे वळली. त्याच्या चेहऱ्यावरील फिकटपणा व हताशपणा यांच्याकडे त्या साधूनें लक्ष दिलें नाहीं. रामचरणदासाच्या लालभडक चमकदार शालीकडे त्या साधूचें लक्ष वेधलें. तिच्याकडे तो कांहीं वेळ टक लावून रोखून पहात होता. रामचरणदासाच्या लक्षांत त्या दृष्टीचा अर्थ यावयाला वेळ लागला नाहीं. आतां पुढें काय होणार हें त्याला कळून चुकलें. तेव्हां त्या साधूनें मागण्यापूर्वीच आपण ती शाल त्याला देऊन टाकलेली चांगली असें त्याला वाटलें. एखाद्या चांगल्या आशाधारक


स्थापना : विजयादशमी १९४२

**— सुवर्ण संधि —**

ज्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास असतो, त्यांचं जीवन नेहमी जगण्यासारखं असतं.
पण केव्हां? जीवनांतील खाचखळग्यांची पूर्वसूचना मिळून योग्य
मार्गदर्शन होईल तेव्हां! माफक खर्चात योग्य सल्ला व
अचूक मार्गदर्शन आगाऊ सूचनेनुसार भेटा.

# जी. एम्. भिवणकर

**हस्तसामुद्रिक व ज्योतिषी**

प्लॉट नंबर २७४, आऊट हाऊस, १ ला रस्ता, पॉवर हाऊसजवळ, खार मुंबई २१
भेटण्याच्या वेळा : शनिवारीं ३ ते ५–३० पर्यंत व रविवारीं नि बँकेला सुटी असेल त्या दिवशीं सकाळीं ९ ते १२ व दुपारीं ३–३० ते ५–३० पर्यंत.
आगाऊ भेटीसाठीं पत्रव्यवहार करावयाचा असल्यास मंगळवारपर्यंत करावा.

मुलाप्रमाणें त्यानें ताबडतोब आपल्या अंगाभोवतालची शाल काढून त्या साधूच्या पुढें ठेवली.

रामचरणदासाचा स्वयंस्फूर्त समजूतदारपणा त्या साधूला आवडला. त्या चेल्याच्या दुसऱ्या खांद्यावर ती शाल गेली. अनवधानानें याच क्षणीं रामचरणदासाच्या हातून त्याची काळ्या चकचकीत मण्यांची जपमाळ खालीं पडली. त्याबरोबर लगेच त्या साधूचें लक्ष तिकडे गेलें. त्या साधूचा एक गुण सांगितला पाहिजे. त्याची आवड निवड चांगली—नव्हे एखाद्या कलावंताची होती, हें येथें सांगणें आवश्यक आहे!

कांहीं एक औपचारिक शब्दहि न बोलतां—कारण त्याची कांहीं आवश्यकताच नव्हती-त्या साधूनें ती माळ उचलली व आपल्या दोन्ही हातांनीं पसरली. दुसऱ्या क्षणींच त्याच्या गळ्याभोंवतीं त्याच्या छातीवर ती माळ विलसूं लागली. प्रसन्न मुद्रेनें त्यानें स्वतःकडे पाहिलें. त्याला मोठें समाधान झालें.

यानंतर आतां या नाटकाचा तिसरा आणि मागील सर्व अंकावर कळस करणारा अंक.

## अंक ३ रा

रामचरणदासानें त्या साधूला चार आणे देण्याचें कबूल केलें होतें. ते आतां त्यानें मागितले. त्यानें आठवण करून दिल्यावर रामचरणदास म्हणाला,

'महाराज, येथून एका फर्लांगावर असलेल्या एका मातेजवळ ते पैसे आहेत. तिच्याकडून मला ते आणले पाहिजेत.'

'कांहीं हरकत नाहीं.' उत्तेजनपर स्वरानें त्या साधूनें उत्तर दिलें, 'तिकडे जाऊन तूं ते घेऊन ये. तूं येईपर्यंत मी येथें थांबावयाला तयार आहे. इतकी तसदी घ्यायला माझी ना नाहीं. तर मग बेटा, ताबडतोब निघ कसा.'

रामचरणदास तेथून निघाला आणि दहा मिनिटांतच परत आला. त्यासाठीं त्याला बहुतेक धावावें लागलें असावें. एका हातांत त्यानें विणलेल्या दोऱ्याची आपल्या पैशाची पिशवी घट्ट धरली होती. त्याची एकूण सारी संपत्ति त्या पिशवींत सामावलेली होती.

त्या साधूसमोर बसून रामचरणदासानें ती थैली उलटी केली. त्याबरोबर खण खण आवाज करीत त्यांतील सर्व नाणीं एकामागून एक घरंगळत जमिनीवर पडलीं. चांदीचे चार रुपये व एक पावली त्यांत होती. त्या साधूला देण्यासाठीं रामचरणदास ती पावली उचलणार तोंच त्या साधूचा उजवा हात झटकन् पुढें आला आणि त्यानें आपल्या रुंद तळव्यानें तीं सर्व नाणीं पकडलीं. तीं सर्व गोळा करून त्यानें शांतपणें आपल्या खिशांत टाकलीं. हें सर्व एक दोन सेकंदांतच घडलें. रामचरणदासानें आपल्या डोक्याला झटका दिला व रिकामी पिशवी हातांत घेऊन तो वर छताकडे पाहूं लागला.

'राम, ती पिशवी आपल्या हातांत ठेवण्याइतका तूं निष्ठूर कसा झालास? तुझ्या पेक्षां त्या साधूला त्याची जास्त गरज आहे हें तुझ्या लक्षांत येत नाहीं काय?'

रामदासाच्या या उद्‌गारांनीं रामचरणदासानें वर छताकडे वळविलेली आपली दृष्टी खालीं आणली. खडीसाख

खातांना त्याला झालेला आनंद कोठच्या कोठे पार नाहींसा झाला होता. त्यानें ती पिशवी त्या साधूला देऊन टाकली. त्याबरोबर त्यानें तीं सर्व नाणीं त्यांत टाकली व मोठ्या हळुवारपणें ती पिशवी आपल्या खिशांत ठेवून दिली.

आपलें काम झाल्यावर साधू जाण्यासाठीं निघाला; आणि निरोप घेण्याच्या भानगडींत न पडतांच आपल्या चेल्यासह तो केव्हांच बाहेर पडून दिसेनासा झाला.

ह्या सर्व वेळ पर्यंत रामदासानें महत् प्रयासानें आपलें हास्य आंवरून ठेवलें होतें. परंतु तो साधू गेल्यावर मात्र त्याला तें आवरेना. तो मोठमोठ्यानें हसूं लागला.

रामदास मोठमोठ्यानें हंसत होता आणि इकडे रामचरणदास मात्र रुष्ट विचारी मुद्रा करून बसला होता. पण कांहीं वेळानें त्यालाहि आपले हंसें न आवरून तो रामदासाबरोबर हंसूं लागला.

'स्वामीजी,' तो उद्गारला, 'इतर वस्तूंवर त्या साधूची नजर गेली त्याबद्दल मला कांहीं वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे तर पैशाबद्दलहि मला कांहीं वाटलें नाहीं. परंतु त्यानें ते व्याजासहित घेतलें मात्र! स्वामीजी, आपल्याला खरें सांगावयाचें तर माझ्या पोटांत कुणीतरी भाला खुपसल्यासारखा मला वेदना झाल्या. आतां मला चांगलें कळून आलें,' अर्थपूर्ण हास्य करून तो पुढें म्हणाला, 'आतां मला चांगलें कळून आलें कीं या साऱ्या प्रकरणाच्या मुळाशीं तुम्हींच आहांत. तुम्हीं दिसतांना मोठे साधे, शांत नि निरागस दिसतां. पण ही सर्व आपलीच लीला आहे. काल रात्रींच तुम्हीं मला आसक्ति आणि स्वामित्वाची भावना या चित्तांत न बाळगण्याचा इषारा दिला होता. आणि आज मला तो धडा प्रत्यक्ष शिकविण्यासाठीं तुम्हीं हें सर्व नाटक करून दाखविलें. अगदीं निःसंशय, हें सगळें तुमचेंच काम आहे.'

रामदास म्हणाला, 'रामा तूं मोठा विलक्षण आहेस. या भटकणाऱ्या साधूंना तूंच येथें घेऊन आलास, हें तूं विसरलास वाटतें? बाह्यतः माझी भेट करवून द्यायला तूं त्यांना इथें घेऊन आलास. पण ज्या वस्तू ते येथून घेऊन गेले त्या सगळ्या त्यांना नजर करून टाकाव्यात असाच तुझा अंतर्यामींचा उद्देश असला पाहिजे. अखेरीस वस्तुतः काय घडलें? ज्या त्यांच्या वस्तू होत्या त्या त्यांना मिळाल्या. तेव्हां आपली कांहीं हानि झाली असा विचार करण्याची गरजच उद्भवत नाहीं. लक्षांत ठेव कीं देवच देतो आणि देवच घेऊन जातो.'

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

### जयकर्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
मे. कांचनलाल वाडीलाल कं.,
दवाबझार, मुंबई २

# चिच्छक्तीचें स्वरूप व कार्य

लेखक : गजानन लक्ष्मण रेगे, बी. ए.

मनुष्यप्राणी जसजसा सुखाच्या पायऱ्या वरवर चढत जातो, तसतसा त्याला आपल्या कर्तृत्वाबद्दल अभिमान वाटत असतो. त्याच्या मनोवृत्ति भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें 'ईश्वरोऽहं अहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी' या भावनांनीं लिप्त होतात. पण एकदा का त्याच्यावर संकटपरंपरा कोसळूं लागली म्हणजे त्याला आपल्या असहायतेची जाणीव होते व आपणांपेक्षां फार प्रबळ–विश्वाची नियामक–अशी दुसरी शक्ति असली पाहिजे असा विचार त्याच्या डोक्यांत घोळूं लागतो व त्याबद्दल तो विचार करूं लागतो. आपल्या प्राचीन ऋषींनीं या चिच्छक्तीचें चिंतन करून आपले विचार उपनिषदासारख्या ग्रंथांतून हजारों वर्षांपूर्वी ग्रंथित करून ठेविले आहेत. उपनिषदांचा काल पाश्चात्य विद्वानांच्या मतानेंही इ. स. पूर्व १२०० वर्षांच्या मार्गे जातो. स्वर्ग, स्थिति आणि लय यासारख्या विश्वाच्या अखंड घटनांचें नियमन करणाऱ्या चिच्छक्तीचा साक्षात्कार त्यांनीं प्रथम अनुभविलेला आहे व हे अनुभव त्यांनीं पुढील पिढ्यांस वेदांतमाच्या द्वारें सुपूर्त केले आहेत. ह्या चिच्छक्तीचे विचार इतर पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्वबे-त्यांच्या मनांत इ. सनापूर्वी पांच सहा शतकांपूर्वी येऊं लागले. भगवान बुद्ध हे क्षणिक वादाचा पुरस्कार करतात. मनुष्याचें जीवित हें आकाशांतील किंचित्काल दिसणाऱ्या धूम केतूसारखें क्षणभंगु[र] आहे. सृष्टि हीच मुळीं संभवनीय गो[ष्ट] नाहीं, असें ते मानतात. ग्रीसमधी[ल] पायथ्यागोरास, इराणमधील झोरोस्ट्र[र] व चीनचे कन्फ्युसिअस हे[ही] चित्स्वरूपी आदितत्वाबद्दल विचार करूं लागले मृत्तिकेपासून मानवी शरी[र] तयार झालें आणि त्या शरीराच्या नाकांत परमेश्वरानें श्वास सोडल्याबरोब[र] तें शरीर जीवंत होऊन आत्म्याचे रूपा[ने] वावरूं लागलें. आंग्लकवि टेनिसन 'इन् मेमोरियम' या काव्यांत म्हणतो– माणसाचा आत्मा हा एक प्रकारचा वायु[.] आत्मा व प्राण एकच आहेत. ती ए[क] पोकळी आहे. जगाच्या ह्या आतित्वाच[ा] शोध पाश्चात्य आधुनिक शास्त्रज्ञही कर[ू] लागले आहेत. सचेतन सृष्टींतील मूल[-]भूत तत्वांचें स्वरूप प्रायोगिक दृष्ट[्या] शोधून काढण्याचे प्रयत्न चालू आहे[त.] प्राण्याचें शरीर हें एका पेशीपास[ून] अनेकविध पेशींत उत्क्रां[त] झालें आहे. त्याच्या मुळाशीं का[र्बन,] आक्सिजन, हायड्रोजन व नायट्रोजन

द्रव्यांनीं बनलेलें प्रोटोप्लाझम नांवाचें द्रव्य आहे व या सर्वांच्या अंतर्यामीं सर्व शरीरांच्या सर्व व्यापारांस कार्यप्रवण करणारें एक सूक्ष्म द्रव्य ( uncleans ) असून तें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें दृश्यमान होतें. ह्यालाच पाश्चात्य शास्त्रज्ञ चिच्छक्ति म्हणतात ! पण शरीरांतून प्राण निघून गेल्यानंतर अगदीं ताबडतोब सुद्धां न्युक्लस द्रव्य शरीरांत असून सुद्धां शरीरांतलीं इंद्रियें कार्यप्रवण होत नाहीत. कारण हें द्रव्य कितीही सूक्ष्म मात्र असलें तरी तें मुळांतच जड आहे. अर्थात् या न्युक्लस द्रव्यव्यतिरिक्त इंद्रियांना कार्यप्रवण करणारी अतींद्रिय चैतन्ययुक्त वस्तु असली पाहिजे ही गोष्ट सिद्ध होते. व याच वस्तूचें स्वरूप जाणण्यासाठीं आपल्या ऋषींनीं मनन चिंतन व ध्यान यांच्या साहाय्यानें प्रयत्न केले. श्वेताश्वतर उपनिषदांत म्हटलें आहे. 'ॐ ब्रह्मवादिनो वदन्ति । किं कारणं ब्रह्म । कुतः स्म जाताः । जीवाय केन । क्व च संप्रतिष्ठा ।'...तसेंच छान्दोग्योपनिषदामध्येंही प्राचीनशाल सत्ययश इत्यादि ऋषि 'कोनु आत्मा,' किं ब्रह्म' या विषयाची मीमांसा करते झाले असा उल्लेख आहे. हें परब्रह्म अनादि, अनंत, नित्य, निरंजन, सर्वव्यापी व चेतनायुक्त आहे असा त्यांनीं सिद्धांत मांडला. हें ब्रह्म किंवा चित् मन इंद्रियें व स्थूल शरीरापेक्षां निराळें आहे. त्यांना त्यांचें असें स्वतंत्र चैतन्य नाहीं. चित् हें आदितत्व असून सर्व द्रव्यांचें अधिष्ठान आहे असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. ह्या चिच्छक्तीमुळेंच सर्व विश्वाला प्रेरणा मिळते. चंद्र सूर्यांना गति मिळते. ती विश्वाची प्रेरक शक्ति आहे. ती जगांतील वस्तूंच्या प्रत्येक कणाकणांत भरून राहिली आहे. हें सर्व जग एक विशाल वर्तुळ मानलें तर त्यांतील प्रत्येक कण हा एक मध्यबिंदु मानावा लागेल. त्याच्या परीधाची मानवी मनास कल्पनाच करतां येणार नाहीं. ज्याच्या परिधाचीच कल्पना करतां येणार नाहीं त्याचा मध्यबिंदु कोणता हें कोण कसें ठरविणार ?

त्याची पूर्ण कल्पना येण्यास आपण स्वतः विश्व बनलें पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

आणि आकाश जैं नव्हे । तया आकाश काय जाणावें ।। जो स्वतः आकाश झाला नाहीं त्याला आकाशाची व्याप्ति कशी समजावी ? XVIII–११४५

चिच्छक्तीचें स्वरूप यांत्रिक शोधांनीं कळणें शक्य नाहीं. ती शास्त्रज्ञांच्या प्रयोगशाळेतील काचेवर परीक्षणार्थ स्थिर राहणारी वस्तु नाहीं. ती 'ज्ञानालाच' गम्य आहे. विज्ञानाला नाहीं. मी हा त्या चिच्छक्तीचा अंश आहे. इतकेंच काय ? या जगांतील प्रत्येक आकर्षक वस्तु ही सुद्धां त्या चिच्छक्तीचाच भाग आहे. भगवान् श्रीकृष्ण म्हणतात,

यत् यत् विभूति मत् सत्वं श्रीमदूर्जित मेवा तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजांशसंभवम् ।।X४१।। जी जी वस्तु वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनीं युक्त आहे, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली आहे असें समज. भगवान् पुढें म्हणतात, 'विष्टभ्याहं इदं कृत्स्नं एकांशेन स्थितं जगत् !' मी आपल्या एकाच अंशानें हें सर्व जग व्यापून राहिलों आहे. शरीरांतील मी हा व्यष्टिरूप ( अंशात्मक ) आहे तर श्रीकृष्णरूप 'मी' ही संपूर्ण

समष्टिरूप आहे. अर्थात् शृंगग्राहिकान्यायानें येथें श्रीकृष्णाबद्दल नित्य, शुद्ध, बुद्ध ब्रह्म अभिप्रेत आहे हें निराळें सांगावयास नको. यालाच चिच्छक्ति असें दुसरें नांव आहे. सांख्य प्रतिशरीरामध्यें सुखदुःख मोह तत्वाहून निराळे असें मित्र, आत्मे किंवा पुरुष आहेत असें मानतात व त्यालाच ते चित्, चिति, चित्स्वरूप किंवा चिच्छक्ति असें म्हणतात. वेदान्त्यांच्या मतें चित्स्वरूप एकच असून तें अखिल विश्वांत भरून राहिलें आहे. व तेंच सर्व विश्वाला प्रेरणा देतें.

आतां हें चित्स्वरूप ठरल्यावर त्याच्या कार्याची मीमांसा ऋषींनीं वेदकाळापासून केली आहे. चिन्मात्र सृष्टीच्या पूर्वीपासून असून त्यापासूनच सृष्टि उत्पन्न झाली आहे. तें एकटेंच आपल्या स्वधेनें वायूशिवाय स्फुरत होतें. हें चित् तपाच्या महिम्यानें प्रकट झालें. अशा तऱ्हेचीं वचनें नासदीय सूत्रांत आढळतात. अनंत कोटि ब्रह्माण्डाची उत्पत्ति हें ह्या चिच्छक्तीचें कार्य आहे. पृथ्वी, चंद्र, सूर्य आणि अनंत तारे यांच्या भ्रमणाला चित्शक्तिच प्रवर्तक आहे. आहे. एवढेंच काय पण ह्या अफाट विश्वांतील क्षुद्र जो पृथ्वी गोल त्यांवरील जीव सृष्टींतील प्रत्येक प्राण्याच्या इंद्रियाची प्रवर्तक ही चिच्छक्तीच आहे. केनोपनिषदांत या प्रश्नाची चर्चा मार्मिकपणें केली आहे. कोणाच्या इच्छेनें मन विषयाकडे प्रवृत्त होतें! कोणाच्या प्रेरणेनें प्राण स्वकीय चेष्टा करीत असतात? वाणी, श्रोत्र व नेत्र यांना प्रेरणा करणार देव कोण? हीं सर्व इंद्रियें जड असल्यामुळें त्यांचा अधिष्ठाता सचेतनच असला पाहिजे हें उघड आहे. आणि तो म्हणजे चिच्छक्ति. त्याचेंच वर्णन प्रस्तुत उपनिषदांत श्रोत्ररूप श्रोत्रं, 'मनसो मनः' असें केलें आहे. म्हणजे या श्रोत्राच्या, नेत्रांच्या व मनाच्या मागें अशी एक प्रेरक शक्ति आहे कीं जिच्यामुळें श्रोत्र नेत्र व मन या साधनांनीं आपणांस ऐकूं येतें दिसतें व विचार करतां येतो. प्राणांचीही तीच स्थिति आहे. प्राणांची प्रवृत्ति इतर सर्व साधनाच्या पूर्वी होते. व त्याच्या प्रयोगाच्या मागोमाग इतर इंद्रियांची प्रवृत्ति होते.

या चित्स्वरूपी आत्म्यानें ज्ञान, तप, दम, कर्म, वेद वेदांगें आणि सत्य यांचे आचरण व अभ्यास या साधनांनीं प्राप्त होते. तस्य तपो दमः कर्मेति प्रतिष्ठाः। सर्व प्राणिमात्रामध्यें अभिनिविष्ट असलेली ही चिच्छक्ति विश्वांतील यच्चयावत शक्तीशीं संबंध असल्यामुळें या चित्शक्तीचा साक्षात्कार झालेला मनुष्य भूत भविष्य, वर्तमानकालाचा व विश्वांतील अखिल दर्शन कार्याचा द्रष्टा होतो. जितकी ज्ञानशक्ति जास्त, तितकें विश्वरूपाचें दर्शन जास्त. अर्जुन व कृष्ण नरनारायणाचे अवतार असल्यामुळें कृष्णानें अर्जुनाला दाखविलेलें विश्वरूप 'तदन्येन न दृष्टपूर्ण' 'पूर्णपर्णों' दिसलें. यशोदेस गणपतीच्या मोदकाचे प्रसंगीं किंवा वसुदेव देवकीला विश्वरूप दाखविलें खरें, पण त्यांनीं पाहिलें तें अंशात्मक रूप होय, भगवंतांनीं सर्व रूप दाखविलें तरी प्रत्येकाला आपापल्या शक्तीप्रमाणें अंशात्मकच रूप दिसलें. मात्र अर्जुनास ज्ञानचक्षूच्या योगानें सर्व विश्वरूप जें इतरांस दिसलें नाहीं तें दिसलें. आपल्यापुढेंही सर्व सृष्टी आहे. पण महायोग्यालाच ती सर्व प्रत्यक्ष दिसतें. कुरुक्षेत्रावरील

विश्वरूप इतर कोणासच दिसलें नाहीं. वस्तुतः प्रत्येकापुढें विश्वरूप सर्वता आहेच. त्याचें यथार्थ दर्शन होण्यास चिच्छक्तीचें ज्ञान आवश्यक आहे व यमनियमादि युक्त असा योगाभ्यास व निष्काम सेवा हीं त्या ज्ञान संपादनाची साधनें आहेत. व्यावहारिक माणसाला सदाचरणानें व सन्तवाङ्मयाच्या अभ्यासानें हें ज्ञान थोडें बहुत प्रमाणांत प्राप्त होणारें आहे. ह्या ज्ञानानें युक्त असणारा मनुष्य निष्काम लोकसेवेनें प्रेरित झाल्यास तो आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति अधिक परिणामकारक रीतींनें करूं शकतो. शिवाजी, तुकाराम, रामदास, टागोर महात्मा गांधी, ज्ञानेश्वर, शंकराचार्य, इत्यादि जगांतील थोर व्यक्तींच्या ठिकाणीं चिच्छक्तीची ही प्रेरणा कमी अधिक प्रमाणांत दिसून येतें. ज्या राष्ट्रांत अशा व्यक्ति अधिक तें राष्ट्र अधिक भाग्यवान, भारतांत अशा व्यक्ति अधिक निर्माण होवोत हेंच परमेश्वरापाशीं मागणें.

सोनगीरचे ह. भ. प. केशवदत्त महाराज म्हणतः—श्रीज्ञानेश्वर महाराजापासून श्रीविवेकानंदासारख्या कित्येक भगवद् भक्तांच्या आत्म्यांनीं या भारतांत प्रकट व्हावें हें खरोखर या देशाचें भाग्य होय. जगांतल्या कोणत्याही देशांत एवढ्या काळांत इतके सत्पुरुष जन्माला आले नाहींत. महात्म्यांच्या अंतःप्राणांत तरुणपिढीला धर्मप्रकाशानें प्रकाशमान करण्याचें सामर्थ्य असतें. त्यांच्या तेजःकिरणांत प्रचंड शक्ति साठविल्या आहेत. या शक्तीचें मूर्त स्वरूप योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण आहेत. या शक्तीचें वितरण करण्याची म्हणजे आत्मशक्ति संक्रांत करण्याची क्रिया श्रीकृष्णांनीं अर्जुनावर प्रसादरूपानें केली. या सामर्थ्यांचा झरा चैतन्य शक्तींत आहे. या शक्तीच्या प्राप्तीसाठीं आमच्यांतील विवेकी व श्रद्धावंतांची प्रात्यक्षिक दृष्टि जगाला मार्गदर्शन करण्याकरितां वळेल का? स्वयंप्रकाश, प्रेमप्रकाश, आनंदप्रकाश, भगवान् योगेश्वर कृष्ण या महात्म्यांच्या अंतःकरणांत आवश्यक गतिमान् शक्ति निर्माण करो हीच इच्छा : इति शम् ।

———




97/183, MAHATMA GANDHI ROAD
OPP. RAJABAI TOWER, BOMBAY 1
Tel. : 253565

# सत्संग आणि प्रार्थना

अनुवादक : मंडणमिश्र

श्रीरामकृष्ण परमहंस यांचे एक सच्छिष्य 'एम्.' यांनीं लिहिलेल्या अमर ग्रंथांत श्रीरामकृष्णांचे, साधक भक्तांशी झालेले संवाद संकलित करून देण्यांत आलेले आहेत. त्या ग्रंथांतील एका प्रकरणाचा अनुवाद येथें दिला आहे—

कलकत्ता येथें प्राणकृष्ण मुखर्जींच्या घराच्या दिवाणखान्यांत श्रीरामकृष्ण आपल्या भक्तांसमवेत बसले होते. दुपारीं एक ते दोनच्या दरम्यानची वेळ होती. कर्नल विश्वनाथ त्याच आवाठांत राहात होते. तेव्हां लिली कॉटेजमध्यें केशवला भेटायला जाण्यापूर्वी कर्नल विश्वनाथना भेटायला जावें असें श्रीरामकृष्णांच्या मनांत होतें. प्राणकृष्णाचे अनेक शेजारी व इतर यांना श्रीरामकृष्णांच्या दर्शनास येण्याचें बोलावणें केलेलें होतें. ते सर्वजण त्यांचे शब्द ऐकण्यास उत्कंठित झालेले होते.

**भगवान्** : ईश्वर आणि त्याचें वैभव. हे विश्व हें त्याचें वैभव आहे. लोक हें वैभव पाहातात आणि त्यांना सगळ्याचा विसर पडतो. या जगाच्या वैभवाचा ज्यांना मोह पडतो ते ईश्वराचा शोध करीत नाहींत. सगळ्यांना कामिनीकांचनाचा हव्यास असतो. पण त्या हव्यासामागें लागल्यावर अनंत दुःखांचा आणि कष्टांचा अनुभव घ्यावा लागतो. हें जग म्हणजे विशालाक्षीच्या (श्रीरामकृष्णांच्या जन्मस्थाननजीकचा एक ओढा) भोंवऱ्यासारखें आहे. एकदा का एखादी होडी त्या भोंवऱ्यांत सांपडली कीं मग तिच्या सुटकेची आशाच नको. किंवा हें जग एखाद्या कांटेरी झुडुपासारखें आहे. एका बाजूच्या कांट्यांतून तुम्ही आपली सोडवणूक करून घेतलीत तर त्या झुडुपाच्या दुसऱ्या बाजूच्या कांट्यांत आपण गुरफटलों आहोंत असें आढळून येतें. एखाद्या चक्रव्यूहांत तुम्ही एकदां शिरलांत कीं त्यांतून बाहेर पडणें मुष्किल होऊन बसतें. जगांत वावरून माणूस जसा कांहीं अगदीं शुष्क, कोरडा होऊन जातो.'

**एक भक्त**—' मग याला मार्ग काय, महाराज ? '

**भगवान्**—प्रार्थना आणि सत्संग. वैद्याची मदत घेतल्याविना तुम्हांला रोगमुक्त होतां येत नाहीं. पण एखाद्या दिवसापुरतें साधुजनांच्या संगतींत राहिलें म्हणजे पुरेसें होत नाहीं. साधुसंग सदैव

घडला पाहिजे. कारण हा भवरोग फार जुनाट व चिवट झालेला असतो. वैद्याबरोबर प्रत्यक्ष राहिल्याखेरीज नाडीज्ञान होत नाहीं. त्याच्या सहवासांत नित्य राहिलें म्हणजे हळूहळू कफाची नाडी कोणती, पित्ताची नाडी कोणती हें कळूं लागतें.

भक्त—'साधुसंगतीचे फायदे कोणते?'

भगवान्—' त्या संगतीमुळें ईश्वराचा ध्यास उत्पन्न होतो. ईश्वराचें प्रेम निर्माण होतें. आध्यात्मिक जीवनांत निदिध्यास नसेल कांहींहि प्राप्त होणार नाहीं. साधुजनांच्या संगतींत सतत राहिल्यामुळें जीवाला ईश्वराची ओढ लागते. त्या ओढीनें जीव बेचैन होतो. ही ओढ कशी असते? घरांत कोणी आजारी असलें म्हणजे माणसांची जशी मनःस्थिति असते तशा मनःस्थितीसारखी ही ओढ असते. त्या माणसाचें मन सदोदित अस्वस्थ असतें. तें आजारी माणूस कसें बरें होईल, यांचा ध्यास त्याच्या चित्ताला सारखा लागून राहिलेला असतो. किंवा नोकरी सुटून बेकार झालेला माणूस नोकरीच्या शोधांत या कचेरींतून त्या कचेरींत हिंडत असतांना त्याच्या मनाला जसा एकच ध्यास लागून तसा ध्यास परमेश्वराबद्दल उत्पन्न झाला पाहिजे. एखाद्या ठिकाणीं ' जागा नाहीं ' म्हणून त्याला घालवून दिलें असलें तरी दुसऱ्या दिवशीं परत तिथें जाऊन तो विचारतो ' आज जागा झाली आहे का हो ? '

दुसरा एक मार्ग आहे. हा मार्ग म्हणजे ईश्वराची उत्कट प्रार्थना करण्याचा. ईश्वर हा आपल्या जिवाचा जिवलग. आपण त्याला म्हणावें—' देवा ! तुझें स्वरूप काय आहे ? मला दर्शन दे. तूं मला दर्शन दिलेंच पाहिजे. कारण नाहीं तर तूं मला जन्माला तरी कशाला घातलेंस ? ' एक शीख भक्त एकदां मला म्हणाला, ' देव दयामय आहे.' मी म्हटलें, ' पण त्याला दयामय कां म्हणायचें ? तो आमचा जन्मदाता आहे. तो आमच्याशीं दयाळूपणें वागला तर


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

## भास्कर लक्ष्मण नार्वेकर

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या—चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें—चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

त्यांत नवल तें काय? आईबाप आपल्या मुलांची जोपासना करतात. त्यांचें हें करणें दयाशीलपणाचें आहे असें तुम्ही कधीं म्हणतां काय? त्यांनीं तसेंच वागलें पाहिजे.' म्हणून आपण आपल्या मागण्या ईश्वरावर लादल्या पाहिजेत. तोच आपला मातापिता आहे. नव्हे काय? मुलानें आपला वारसा मिळण्याचा हट्ट धरला नि त्या हट्टापायीं त्यानें तो मिळेपर्यंत अन्नपाणी वर्ज्य केलें, तर कायदेशीर काळापूर्वी तीन वर्षे आईबाप मुलाच्या वांट्या त्याच्या हवालीं करून मोकळीं होतात. किंवा मूल आईजवळ पैसा मागतें आणि पुन्हांपुन्हां म्हणतें, 'आई! मला दोन पैसे हवेत. देना मला दोन पैसे. मी पायां पडतों तुझ्या. मला दोन पैसे दे' मग त्याची ती काकुळत पाहून व तीं अधिक ऐकणें असह्य होऊन आई मुलाच्या अंगावर दोन पैसे फेंकते.

'साधुसंगाचा आणखी एक फायदा आहे. त्यानें माणूस नित्यानित्यविवेक करायला शिकतो. ईश्वर हाच काय तो सत्य आहे. ईश्वर हीच एक नित्यवस्तु आहे. जग असत्य आहे, अनित्य आहे. असत्याकडे आपलें मन धांव घेतांना आढळलें कीं माणसानें नित्यानित्यविवेकाचा अंकुश टोंचून मनाला ताळ्यावर आणावें. हत्ती सोंड उचलून शेजाऱ्याच्या आवारांतलें केळीचें झाड उपटणार असें दिसतांच त्याला माहुताच्या अंकुशाचा प्रसाद मिळतो.'

**एक शेजारी**—'माणसाला पापी वासना कां असतात?'

**भगवान्**—'ईश्वराच्या सृष्टींत सर्व तऱ्हेच्या गोष्टी आहेत. त्यानें चांगलीं तशींच वाईट माणसें उत्पन्न केलीं आहेत. आपल्याला सद्वासना तोच देतो आणि असद्वासनाहि तोच देतो.'

**शेजारी**—'असें म्हणायचें म्हणजे मग आमच्या दुष्कृत्यांबद्दल आम्ही जबाबदार नाहीं असें ठरलें नव्हे काय?'

**भगवान्**—'पाप आपलें फळ स्वतःच तयार करतें. हा ईश्वरी कायदा आहे. मिरची चावली तर जिभेची आग आग होणारच. तारुण्यांत माथुर थोडा स्वैरपणें वागला होता. त्यामुळें मरणापूर्वी त्याला अनेक रोगांनीं बेजार केलें होतें.

'माणसाला हें तरुण वयांत उमजत नाहीं. काली मंदिराच्या अंतर्भागांत लांकडें जळतात तीं मी लक्षपूर्वक पाहिलीं आहेत. प्रथम ओलें लांकूडहि पेट घेतें. त्याच्यांत फारसा ओलसरपणा आहे असें वाटत नाहीं. पण लांकूड बरेंच जळलें म्हणजे त्यांतील सगळा ओलसरपणा टोंकाशीं गोळा होतो. नंतर तें पाणी लांकडांतून बाहेर फुटतें आणि आग विझवून टाकतें.

'तसें माणसानें क्रोध, काम आणि लोभ यांच्याबद्दल सारखें जागरूक राहिलें पाहिजे. हनूमानाचें उदाहरण घ्या. रागाच्या भरांत त्यानें लंका जाळून टाकली. अखेरीस त्याला आठवलें कीं सीतामाई अशोकवनांत आहे. आणि मग ती आग कदाचित सीतेला झळ पोंचवील या भीतीनें तो थरथर कांपूं लागला.'

**शेजारी**—'ईश्वरानें दुर्जन कां निर्माण केले आहेत?'

**भगवान्**—'त्याची इच्छा. त्याची ही लीला आहे. ईश्वरी मायेंत विद्या आणि अविद्या या दोहोंना अस्तित्व आहे.

काळोखाचीहि आवश्यकता असते. प्रकाशाचें संपूर्ण वैभव काळोखाच्या अस्तित्वामुळेंच विशेष प्रत्ययास येत असतें. क्रोध, काम आणि लोभ ह्या अनिष्ट गोष्टी आहेत यांत मुळींच संशय नाहीं. मग ईश्वरानें त्या निर्माण कां केल्या ? तर संतांना निर्माण करण्यासाठीं. इंद्रियांवर जय मिळूनच माणूस संत होतो. आपल्या वासनांचें ज्यानें पूर्ण नियमन केलें आहे अशा माणसाला काय अशक्य आहे ? ईश्वरी कृपेनें अशा माणसाला ईश्वराचा साक्षात्कारहि घडतो. परत कामाच्या प्रभावानें ईश्वराचा सृष्टीचा खेळ कसा अविरत चालू राहिला आहे पहा !

'दुर्जनांचीहि गरज आहे. एकदां एका ठिकाणचीं कुळें अगदीं पिसाळलीं. मालकाला शेवटीं गोलक चौधरीला बोलावणें पाठवावें लागलें. गोलक हा पहिल्या प्रतीचा मवाली. त्याचा सारा कारभार असा कडक होता कीं त्याचें नुसतें नांव ऐकूनच कुळें चळचळ कांपत.

'जगांत प्रत्येकाची गरज आहे. एकदां सीता आपल्या पतीला म्हणाली, 'रामचंद्रा! अयोध्येंतील प्रत्येक घर म्हणजे एकेक राजवाडा असें झालें तर किती छान होईल ! ' त्यावर राम म्हणाला, 'पण प्रिये ! सगळींच घरें टुमदार झालीं तर मग गवंड्यांचें काय होईल ? ' (हंशा) ईश्वरानें विविध वस्तु निर्माण केल्या आहेत. छायापूर्ण वृक्ष त्यानें निर्माण केलें आहेत आणि विषारी वेली व तणहि त्यानेंच निर्माण केलें आहे. जनावरांत चांगलीं वाईट सर्व्या तऱ्हेचीं जनावरें आहेत. वाघ आहेत, सिंह आहेत नि सर्पासारखे प्राणीहि आहेत.

**शेजारी**—'महाराज ! गृहस्थाश्रम पाळूनहि ईश्वराचा साक्षात्कार करून घेणें माणसाला शक्य आहे काय ? '

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक.

गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

टिळकवाडी (बेळगांव)

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे, मोत्यांचे, सेटिंगचे, आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

**भगवान**—'खात्रीनें. पण मी आतां सांगितल्याप्रमाणें सत्संग ठेवून ठेवून सतत प्रार्थना करण्याचा क्रम चालू ठेवला पाहिजे. ईश्वरासाठीं माणसानें अश्रु गाळले पाहिजेत. त्यानें मनाची अशुद्धता धुवून निघते आणि अशा विशुद्ध मनाला ईश्वरदर्शन घडतें. चित्त हें चिखलमाती लागलेल्या सुईसारखें असतें व ईश्वर हा लोहचुंबकासारखा असतो. सुईवरचा चिखल कायम असेतो वर ती सुई लोहचुंबकाकडे आकर्षित होत नाहीं. अश्रूंनीं हा चिखल धुवून निघतो. काम, क्रोध आणि इतर दुष्प्रवृत्ति ह्या चिखलासारख्या आहेत. हा चिखल आणि संसारसुखाकडील ओढ अश्रूंनीं धुवून नाहींशीं होतात. चिखल धुवून गेला कीं लोहचुंबक सुईला आपल्याकडे ओढून घेतो—म्हणजेच माणसाला ईश्वराचा साक्षात्कार घडतो. जे अंतःकरणानें पवित्र आहेत तेच कायते ईश्वराचें दर्शन घेऊं शकतात. तापानें आजारी असलेल्या माणसामध्यें जल—प्रमाण पुष्कळच असलें तर तें नाहींसें होईपर्यंत त्याला नुसतें कोयनेल देऊन काय उपयोग ?

'संसारांत राहूनहि माणसाला ईश्वर-दर्शन कां होऊं नये? पण मघां सांगितल्या-प्रमाणें सत्संग, नित्यप्रार्थना, त्याच्या कृपेसाठीं आक्रंदन आणि अधूनमधून एकांतवास ह्या गोष्टी आवश्यक आहेत. प्रारंभीं वाटेवरचीं शेतें ही कुंपण घालून राखावीं लागतात. नाहींतर गुरें ढोरें केव्हांच तीं फस्त करून उध्वस्त करून टाकतील.'

**शेजारी**—'म्हणजे एकूण गृहस्था-श्रमी माणसालाहि देवाचें प्रत्यक्ष दर्शन घडूं शकेल तर. होय ना ?

**भगवान्**—'प्रत्येकाला मुक्ति खास मिळेल. पण माणसानें गुरूचा उपदेश प्रत्यक्ष आचरणांत उतरविला पाहिजे. नागमोड्या वळणांनीं जाऊं लागलें म्हणजे परत मागें फिरतांना प्रवाश्याचे हाल होतात. मुक्ति प्राप्त करून घेणें ही दीर्घावधीची गोष्ट आहे. एकाच जन्मांत माणसाला क्वचित् मोक्ष संपादन करतां येणार नाहीं. कदाचित् अनेक जन्मांतरें होऊन गेल्यावर त्याला मुक्तिलाभ होईल. जनकासारख्या महर्षींनीं सांसारिक कर्तव्यें पार पाडलीं. तीं कर्तव्यें करीत असतां त्यांच्या चित्तांत ईश्वर ध्यान सतत चालू असे. एखादी नर्तिका कुंभ वा तबक डोक्यावर घेऊन नाचत असली म्हणजे नाचतां नाचतांहि डोक्या-वरील वस्तूंचें तिचें भान सुटत नाहीं तसेंच ईश्वराचें भान अखंड राहिलें पाहिजे. उत्तर हिंदुस्थानांतल्या स्त्रिया डोक्यावर पाण्याचे घडे घेऊन हंसत खेळत बोलत कशा चाललेल्या असतात तुम्हीं पाहिलें नाहीं का ?'

**शेजारी**—'आतां आपण गुरुच्या उपदेशाचा उल्लेख केला. गुरु आम्हांला कसा आढळेल ?'

**भगवान**—'कोणीहि ऐऱ्यागैऱ्या गुरू होऊं शकणार नाहीं. इमारतीच्या लांकडाचा भलामोठा ओंडका पाण्यावर तरंगत असतो. तो जनावरेंहि आपल्यावर पेलून नेऊं शकतो. पण लहान हलकें लांकूड मात्र माणसाच्या भारानें तत्काळ स्वतः बुडतें आणि त्या माणसालाहि

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास

× × ×

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता—प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

## श्रीमद्भगवद्गीता अध्याय १५ वा

ज्या, खालिं शाखा, वर मूळ राही
संसार—वृक्षा व्यय त्या न कांहीं।
पार्था, जया चारहि वेद पानें
या जाणता वेद यथार्थ जाणे ॥ १ ॥

ज्यांची वाढ गुणांमुळें, विषय हा ज्यांना फुटे अंकुर
शाखा या तरुच्या, अशा पसरल्या, खालीं तशा त्या वर
कर्मापाशिं अखेर, पंडुकुमारा, जीं येउनी पोंचतीं
ऐशीं, मानवलोकिं या, पसरलीं मूळें बहू खालतीं ॥ २ ॥

तो दृश्यरूपांत दिसे न कोठें
आधार वा आदि, न अंत त्यातें।
मूळें तयाचीं रुतलीं सखोल
वैराग्यशस्त्रें निपटीं समूळ ॥ ३ ॥

जगत्पसारा रचिला जयानें
जातां जिथें मागुति नाहिं येणें।
'मी आसरा त्या पुरुषास मागें'
म्हणून त्या शोधित, चाल मार्गें ॥ ४ ॥

गेला तो अभिमान, मोह, रमती आत्म्यांतची जे सदा
जे निष्काम, न लिप्त होति जन जे आसक्ति—दोषें कदा

द्वंद्वें तीं सुखदुःख नामक न ज्यां कीं सर्वथा बाधती
पार्था अव्यय त्या पदाप्रति जन ज्ञानीच ते पावती ॥ ५ ॥

जें दाखवाया न शके रवीही
न चंद्र वा पावक दीप्त तोही ।
जातां जियें मागुति ये न कोणी
तें स्थान माझें परमोच्च मानीं ॥ ६ ॥

जो सर्व काळीहि वसे असा तो
मदंशची भूवरि जीव होतो ।
स्वाभाविका पांचहि इंद्रियातें
आकर्षुनी वेड् तथा मनातें ॥ ७ ॥

धरीतसे देह यदा नवा तो
वा टाकुनी तो दुसऱ्यांत जातो ।
नेई तदा संगति इंद्रियांस
फुलांतुनी वायु जसा सुवास ॥ ८ ॥

डोळे त्वचा जीभ नि नाक, कान
तसें सहावें मन यांत ठाण ।
मांडून तेथें बहुत–प्रकारें
भोगीतसे हा विषया पहा, रे ॥ ९ ॥

देह त्यजी वा करि वास देहीं
भोगीतसे जो विषया गुणांही ।
अज्ञानि लोकांस दिसेचिना तो
ज्ञानीजना स्पष्ट परी दिसे तो ॥ १० ॥

प्रयत्न ज्यांचा परि योग–युक्त
त्यांना दिसे तो स्थित आपणांत ।
विचार–संस्कार न कांहि ज्यांतें
यत्नेंहि ते ओळखतीं न यातें ॥ ११ ॥

साऱ्या जगा या करितें प्रदीप्त
जें तेज ऐसें दिसतें रवींत ।
चंद्रांत जें अग्नित जें तथाही
माझेंचि तें हें समजून राही ॥ १२ ॥

प्रवेश पृथ्वीत करून, पार्था
तेजें करीं धारण मीच भूतां ।
मी होऊनी चंद्र वनस्पतींना
पाजीतसें सोमरसां, पहा ना ॥ १३ ॥

मीच स्वयें सर्वहि जीवदेहीं
घेऊन वैश्वानररूप राही ।
अपान नि प्राण, समान–वातें
मी अन्न टाकीं पचवून तेथें ॥ १४ ॥

साऱ्या जनांच्या हृदयीं वसें मी
ज्ञानस्मृती देउन नाशिही मी ।
वेदज्ञ मी, धुंडिति ते मलाच
वेदांत कर्ताहि तथैव मीच ॥ १५ ॥

द्विविध पुरुष पार्था या जगामाजि पाही
' क्षर ' पुरुष विनाशी, ' अक्षरा ' नाश नाहीं ।
' क्षर ' सकलहि भूतें, मूल त्यांचें जयांत
म्हणति ' पुरुष ' त्यातें ' अक्षर ' ज्ञानवंत ॥ १६ ॥

निराळा या दोन्हीहुन पुरुष तो उत्तम खरा
अशा त्या, हे पार्था, म्हणती परमात्मा प्रभुवरा
वसे तो पातालीं, सुरभुवनिं तैसा महिवरी
त्रिलोका व्यापूनि; व्ययरहित, तत्पोषण करी ॥ १७ ॥

पुरुष जो ' क्षर ' पार तयाहुनी
पुरुष ' अक्षर, ' उत्तम त्याहुनी ।
म्हणुनि वेद नि लोक अशा मला
म्हणति ' हा पुरुषोत्तम आगळा ॥ १८ ॥

अशा मला जो पुरुषोत्तमास
जो जाणतो तोडुनि मोहपाश ।
जाणावया त्या उरलें न कांहीं
तो सर्वभावें मम भक्त होई ॥ १९ ॥

७६२

निवेदिलें जें तुज शास्त्र आतां
तें गुह्य गुह्यांतील शुद्ध पार्था ।
हें चांगलें जो समजून घेई
तो जाणता नी कृतकृत्य होई ॥ २० ॥

---

## अध्याय १६ वा

निर्भयत्व, मनः शुद्धि, यज्ञ; दान, पवित्रता ।
अभ्यास आत्म विद्येचा, त्याग, शांति, निगर्विता ॥
धैर्य, तेज, क्षमा, लज्जा कुकर्मी, सत्य संयम ।
सरलत्व, दया भूतीं, अहिंसा, हे अरिंदम ॥ १ ॥
स्थैर्य तें कर्मयोगीं नी ज्ञानयोगांत वर्ततां ।
अभाव क्रोध लोभाचा चहाडीचाहि तो तथा ॥ २ ॥

अचांचल्य नि अद्रोह, तप, मार्दव, भारता ।
गुण हे लाभती दैवी संपत्तीमाजि जन्मतां ॥ ३ ॥

अहंता, ढोंग, अज्ञान, क्रोध, गर्व, कठोरता ।
लाभती आसुरी—नामें संपत्तीमाजि जन्मतां ॥ ४ ॥

दैवी संपत्ति ने मोक्षा, निबद्ध करि आसुरी ।
दैवींत जन्मलासी तूं, पार्था, शोक न, या करीं ॥ ५ ॥

प्राणि द्विविध लोकीं या, दैव आणिक आसुर
वर्णिले दैव विस्तारें, आतां तूं ऐक आसुर ॥ ६ ॥

करावें काय ? टाकावें काय ? आसुर नेणती ।
पवित्र ते न, सत्यत्वें, सदाचारें न वागती ॥ ७ ॥

म्हणती ते निराधार, जग, खोटें, निरीश्वर ।
झालें अन्योन्य—योगें ना; हें न भोगार्थ; कां तर ? ॥ ८ ॥

अंगीकारूनि ही दृष्टी, नष्ट नी जडधी किती
क्रूरकर्मी क्षयासाठीं जगाच्या रिपु जन्मती ॥ ९ ॥

मत्त ढोंगी नि मानी ते काम दुष्पूर सेविती
भलतें कल्पुनी मोहें, पापकर्मीं प्रवर्तती ॥ १० ॥
मरतों भोग-चिंतेनें सदा व्याकुळ ते मनीं ।
कामोपभोगसक्ता त्यां तोंचि सर्वस्व जीवनीं ॥ ११ ॥
आशेंत गुंतले; काम-क्रोधांची धरुनि संगति
धन-संचय अन्यायें भोगार्थ करुं इच्छिती ॥ १२ ॥
हें मी मिळविलें आज, उद्यां मी मिळवीन तें ।
द्रव्य हें एवढें माझें, मिळणार मलाच तें ॥ १३ ॥
वधिलें शत्रुला या मी, निर्दाळीनहि आणखी
शास्ता मी सिद्धभोक्ता मी, मी बलाढ्य असें सुखी ॥ १४ ॥
संपन्न कुलवान् माझ्यासम कोण? करीन मी
यज्ञ, दान, मजा ऐसें अज्ञानें भ्रान्त जे तमीं ॥ १५ ॥
कल्पना-भ्रान्त, भोगांत सक्त, मोहांत गुंतले
अपवित्र नरकीं, पार्था, पडती; काय चांगलें? ॥ १६ ॥
आत्मश्लाघी, धनें मानें मत्त गर्विष्ठ आणिक
करिती यज्ञ नांवाचे दंभें अविधि-पूर्वक ॥ १७ ॥
अहंकार-बल-क्रोध-काम-गर्वांचिया भरें
माझा स्व-पर-देहांत करिती द्वेष मत्सरें ॥ १८ ॥
द्वेष्ट्या अशुभकर्मी त्या क्रूर ऐशा नराधमा
पापयोनींतची टाकीं संसारीं नित्य, न क्षमा ॥ १९ ॥
जन्मोजन्मीं असे मूर्ख आसुरी योनि पावती
माझ्या प्राप्तीविना जाती उत्तरोत्तर खालतीं ॥ २० ॥
तीन हीं नरकद्वारें नाशा कारण आपुल्या
काम क्रोध तिजा लोभ, त्यजावें, बा म्हणून त्यां ॥ २१ ॥
अंधाऱ्या या, तिन्ही द्वारांमधूनी सुटतां नर
लागे कल्याण-मार्गाला; पावे सद्गति नंतर ॥ २२ ॥
शास्त्रोक्त-विधि सोडूनी करी वाटेल जें मना
लाभे सिद्धि न, त्या, सौख्य न च सद्गति, अर्जुना ॥ २३ ॥
मानीं शास्त्र म्हणूनी तूं कार्याकार्य कळावया
शास्त्राज्ञा जाणुनी कर्म तूं करावेंस लोकिं या ॥ २४ ॥

# अध्याय १७ वा

**अर्जुन म्हणाला:—**

श्रद्धायुक्त असूनी शास्त्रविधी टाकुनी यजन करिती ।
त्यांची सात्विक, राजस कां तामस, सांग, माधवा, वृत्ति ।।। १ ।।

**श्रीभगवान म्हणाले:—**

जीवांत स्वाभाविक, पार्था, तीन प्रकारची असते ।
श्रद्धा,—सात्विक—राजस तामस ती केवि, ऐकूनी घेतें ।। २ ।।
श्रद्धा प्रकृतिप्रमाणें वास करी सहज जीवमात्रांत ।
श्रद्धामय पुरुष, जशी ती, तो तैसा, असाच सिद्धांत ।। ३ ।।

सात्विक पूजिती देवांतें ।
राजस राक्षस—यक्षांतें ।
भूत—प्रेत—पिशाच्चांतें ।
तमोगुणी ।। ४ ।।

दंभी नि अंहकारी, काम—प्रेमें बळावले बहुत ।
जे जन शास्त्रोक्त विधि त्यजुनी तप उग्र फार करितात ।। ५ ।।
देहस्थ पंचभूतां, अंतःस्थ मलाहि कष्ट देऊन ।
अविवेकी ते, त्यांचा निश्चय दृढ तरिहि आसुरी, जाण ।। ६ ।।
आहार प्रिय सर्वा, त्याचे तीन प्रकार, त्यां परिस
तप—यज्ञ—दान यांचे, पार्था त्यांतील भेद तूं परिस ।। ७ ।।
जे प्रीति, आयु, सुख, बल, आरोग्य नि सत्त्व नित्य वाढविती
स्निग्ध, स्थिर, तोषद ते, रसमय आहार सात्विका रुचती ।। ८ ।।
कटु, रुक्ष, आम्ल, खारट, तिखट नि अत्युष्ण दाह जे करिती
ते दुःख—शोक—रोगा कारण आहार राजसा रुचती ।। ९ ।।
दुर्गंधियुक्त, नीरस, उच्छिष्ट, शिळें तसें निवालेलें
प्रिय अन्न तामसांतें, यज्ञासाठीं अयोग्य जें झालें ।। १० ।।
पाळूनि शास्त्रविधिजो, कर्तव्य म्हणून यज्ञ करितात
शांत मनें, न फलाशा धरितां, सात्विक तयास म्हणतात ।। ११ ।।
धरुनि फलाकांक्षा जे, केवल दंभार्थ यज्ञ करितात
ऐश्वर्य दाखवाया, ' राजस ' ऐसे तयास म्हणतात ।। १२ ।।
विधि, मंत्र, दान भोजन तर्पण यांवीण यज्ञ जो केला ।
श्रद्धा नसतां ह्रदयीं, ' तामस ' म्हणतात, अर्जुना त्याला ।। १३ ।

देव—द्विज—गुरु—विद्वान् यांची पूजा शुचित्व या म्हणती
' तप शारीर ' अहिंसा, सरलत्व, ब्रह्मचर्य, सांगाती ॥ १४ ॥
सत्य प्रिय हितकर ही भाषण, बोचेल जें न पर—हृदया
स्वाध्यायाभ्यास, असें ' वाङ्मय—तप ' बोलिलें असे, विजया ॥ १५ ॥
सौम्यपणा नि मनाचा निग्रह आणि प्रसन्नता, मौन
भावाची निर्मलता, ' मानस तप ' म्हणति या, सख्या, जाण ॥ १६ ॥
परम श्रद्धेनें या त्रिविध तपाचें घडे अनुष्ठान
समबुद्धीनें, ' सात्विक ' म्हणती त्यातें, जिथें फलाशा न ॥ १७ ॥
साधक—जन दंभानें करिती सत्कार—मान पूजार्थ
' राजस ' म्हणतो ऐशा, चल नीं अस्थिर तपास, हे पार्थ ॥ १८ ॥
कष्टुनि केलें जातें, मूर्खपणानें दुराग्रहानेंही
नाशावया परा वा ' तामस ' म्हणतात त्या तपा पाहीं ॥ १९ ॥
द्यायास हवें म्हणुनी, न करी उपकार, त्या दिलें जाई
तें दान होय ' सात्विक ' सत्पात्रीं, सुस्थलीं नि जें समयीं ॥ २० ॥
तें दान होय ' राजस ' जें फेडायास पूर्व उपकार
वा भाविलाभ लक्षुनि, देतां जें कष्ट वाटती फार ॥ २१ ॥
भलत्या स्थळीं, अवेळीं आणि अपात्रीं, न ठेवितां मान
अवहेलन—पूर्वक जें, तें ' तामस ' दान, अर्जुना, जाण ॥ २२ ॥
निर्देश ब्रह्माचा ' ॐ तत् सत् ' त्रिविध यापरी करिती ।
तेणें पूर्वी वेद ब्राह्मण नी यज्ञ निर्मिले असती ॥ २३ ॥
' ॐ ' ऐसे उच्चारुनि, यास्तव, तप—यज्ञ—दान—कर्मातें ।
प्रारंभिति विधिपूर्वक, ते नित्य, ब्रह्मलालसा ज्यांतें ॥ २४ ॥
' तत् ' ऐसें उच्चारुनि फल भोगेच्छा धरूनि न मनांत ।
यज्ञ—तपो—दानादिक बहुविध कर्मे मुमुक्षु करितात ॥ २५ ॥
आस्तित्व, साधुता, याअर्थी ' सत् ' शब्द योजिला जातो ।
निर्देशाया मंगल कर्माहि योग्य शब्द तो ठरतो ॥ २६ ॥
तप, यज्ञ, दान यांत स्थिरता जी तीस ' सत् ' असें म्हणती
जें कर्म त्यांजसाठीं त्यालाही ' सत् ' असेंच बा, म्हणती ॥ २७ ॥
दान, हवन, तप, कर्म, श्रद्धेवांचूनि जें असें केलें
म्हणती त्यास ' असत् ', फल त्याचें परलोकिं वा इथें न मिळे ॥२८॥

२८/२९

# श्री ज्ञानेश्वर – जीवन

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

## प्रकरण ८ वें

### रेड्याच्या तोंडीं वेद !

ज्ञानेश्वरांच्या चरित्रांत चमत्कारांचा भाग आला कीं लगेच कांहीं लेखक शंकित होतात. त्यांच्यामतें ज्ञानेश्वर हे चमत्कारांच्या नादीं लागणारे नव्हते. ही गोष्ट खरी पण एवढ्यावरूनच ते चमत्कार मुळीं झालेच नाहींत किंवा कोणीतरी 'रेडे' नांवाच्या माणसाकडून ज्ञानेश्वरांनीं वेद बोलविलें असतील असासुद्धां प्रवाद कांहीं लेखक करितात. भौतिक शास्त्राप्रमाणेंच चमत्कारांच्या घटना ह्या अतींद्रिय अशा शास्त्राच्या सिद्धीनें होतात हें तत्त्व ज्ञानेश्वरांना मान्य होतें. एकाद्या शास्त्राचें लेखकाचें अज्ञान ही कांहीं त्या शास्त्राची खरी कसोटी नाहीं. उलट अशा विवक्षित शास्त्रांत मुळींच गति नसलेल्या लेखकांची मतें सरसहा चुकीची ठरतील हें उघड आहे. अशा परिस्थितींत आधुनिक, विशेषतः प्राध्यापक लेखकांनीं सारे चमत्काराचे प्रसंग जसेच्या तसे देऊन आपलें कर्तव्य करणें हें खरोखर सत्यास धरून ठरेल. नाहींतर त्या संकल्पित चरित्राचें मुळचें स्वारस्य लोपलें जाऊन त्यांतील काव्याचा रसभंग होईल. हा दोष टाळण्यासाठीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्रांतील सारे चमत्कार जशाच्या तसेच देणें हेंच उचित होय. प्रस्तुत प्रबंधांत ह्याच मार्गाचें अवलंबन केलें आहे.

निवृत्ति ज्ञानदेव पैठणास गेले, पैठण म्हणजे पांडित्याचें माहेरघर. निवृत्ति-ज्ञानदेवांच्या मनांत शुद्धिपत्र मिळविण्यापेक्षां पैठणच्या पंडितांचें पांडित्य अजमावयाचें होतें. वादविवादांत ह्या आळंदीच्या पोरांना आपण चुटकीसरसे मारूं अशी पैठणच्या ब्रह्मवृंदास खुमखुमी होती. पण झालें उलट ! निवृत्ति ज्ञानदेवांनीं पैठणच्या पंडितांचा सपशेल पराभव केला. दोन्हीं पक्षांनीं वादाच्या प्रारंभीं जर आपापल्या मशाली लावल्या असत्या तर पैठणच्या ब्राह्मणांना खास आपली मशाल विझवावी लागली असती. वादांत जरी कोणी कितीहि पराभूत झाला तरी पूर्वग्रह जर बळकट असले तर आपला दुराग्रह सोडीत नाहीं. त्याचप्रमाणें पैठणच्या ब्राह्मणांना सत्य कळलें होतें पण वळलें नव्हतें. कसें वळणार ? त्यांना कांहीं निवृत्ति–ज्ञानदेवांप्रमाणें आपल्या चरितार्थावर तुळशीपत्र ठेवून संन्यास घ्यावयाचा नव्हता. पैठणच्या ब्राह्मणांनीं त्यांना शुद्धिपत्र देण्याचें साफ नाकारलें आणि तुम्हीं ह्यापुढें ईश्वर भजनांत कालक्रमण करा असा उपदेश केला. पोटाच्या मागें लागलेल्या ह्या प्रापंचिकांकडून ह्या भावंडांना असा उपदेश व्हावा हेंच आश्चर्य होय, पण पैठणच्या कावळ्यांनीं आळंदीच्या ह्या परमहंसांना हा उपदेश दिला,

हें ऐतिहासिक सत्य होय. पैठणच्या ब्राह्मणांनीं निवृत्ति–ज्ञानदेवांना शुद्धिपत्र दिलें असा जो सर्वत्र गवगवा केला तें हें शुद्धिपत्र! ह्याला शुद्धिपत्र म्हणून मोठें गोंडस नांव ठेवून तत्कालीन ब्राह्मणांनीं आपल्या अन्यायावर सारवण घातलें. एरव्हीं सत्ता, स्वार्थ आणि पूर्वग्रहाला बळी पडलेल्या माणसांनीं दिलेल्या शुद्धिपत्राला शुद्धिपत्राऐवजी 'बेशुद्धिपत्र' असेंच म्हणावें लागेल. ब्राह्मणांनीं ह्या भावंडांना शुद्धिपत्र तर दिलें नाहींच पण त्यांच्या नांवावर विदुषकी कोट्या करून त्यांची टर मात्र खूप केली. एक त्यांना दगड मारण्याचीच काय ती बाकी ठेविली होती. टवाळ लोक हीं भावंडें रस्त्यांतून जात असतां त्यांच्या मागें लागले. त्यापैकीं एकानें ज्ञानेश्वरास त्याचें नांव विचारलें. तें ऐकतांच तो मिस्किलपणें म्हणाला 'काय ज्ञानेश्वर! काय पण नांव ज्ञानेश्वर! अरे, हा बघ हल्या चालला आहे ना, त्याचें पण नांव ज्ञानेश्वरच आहे, मग तुम्हांत नि त्यांच्यांत फरक काय? त्यावर 'कांहींच नाहीं.' असें ज्ञानेश्वरांनीं उत्तर दिलें. त्यावर दुसरा एक इसम पुढें होऊन 'कायरे, ह्याच्या पाठीवर फटके मारले तर तुझ्या पाठीवर त्याचे वळ उठतील, नाहीं का?' असें म्हणून त्यानें त्या रेड्याच्या पाठीवर प्रहार केला. लगेच ज्ञानेश्वरांनीं आपल्या पाठीवर त्या कोरड्याच्या प्रहाराचा वळ उठविलेला त्यांना दाखविला. हें पहातांच पुढची टवाळ मंडळी घाबरून मागें सरली, पण त्यांत कांहीं अगदीं निगरगट्ट असे लोक होतेच. त्यापैकीं एकजण पुढें होऊन म्हणाला 'अरे, जर तुझ्यांत नी ह्या रेड्यांत जर कांहीं फरक नाहीं तर हा वेदसुद्धां म्हणेल, नाहीं का? ह्यावर निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव ह्यांच्यांत नेत्रसंकेत झाले. सिद्धीच्या जोरावर ज्ञानेश्वरांना जरी काय वाटेल तें करणें शक्य असलें तरी सद्गुरूच्या आज्ञेशिवाय तें तसें करणें योग्य नव्हतें. पण निवृत्तिनाथांनीं नेत्रसंकेतानें आज्ञा देतांच, त्या निगरगट्ट माणसास ज्ञानेश्वर महाराज म्हणाले, 'तुमची ब्रह्मवृंदाची जर इच्छा असेल तर काय होणार नाहीं? हा रेडासुद्धां वेद बोलेल.' हे शब्द ज्ञानेश्वरांच्या तोंडून निघतांच तो रेडा खरोखरच वेद म्हणूं लागला. ते टवाळ लोक तोंडें 'आ' वासून हा चमत्कार पाहूं लागले! त्याचे उच्चार देखील इतके स्पष्ट व शुद्ध कीं ते ऐकून त्या टवाळ विप्रांना देखील लाज वाटूं लागली. निरंजन माधवांनीं ह्या प्रसंगाचें 'जें अग्निमीळे स्वर युक्त बोले। हे ऐकतां विस्मित विप्र झाले। कांहीं यजुर्वेद साम कांहीं। ऐसा न ये सुस्वर सामकांहीं' ह्या शब्दांत छान वर्णन केलें आहे. हा चमत्कार पैठणांत माघ शुद्ध ५ शके १२०९ त घडला. सर्व लोक आश्चर्यचकित झाले. कांहीं भाविक लोक तर निवृत्ति–ज्ञानदेवांचे पाया पडण्यास पुढें सरसावले. पण हीं चार्‍हीं भावंडें झपाझप पावलें टाकीत त्या गर्दीतून दूर गेलीं. दिव्य नाथपरंपरेंतल्या ज्ञानेश्वरांना रेड्याच्या तोंडून वेद बोलविणें थोडेंच अवघड होतें! पैठणांत ह्या भावंडांची कीर्ति हां हां म्हणतां वाढली, एक ब्राह्मणाची ह्यांच्यावर फार भक्ति जडली, त्यानें ह्या भावंडांस आपल्या वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशीं भोजनाचें आमंत्रण दिलें. ह्या भावंडांना आळंदीच्या ब्राह्मणांनीं वाळींत टाकल्यापासून ब्राह्मणांच्याकडलें असें हें पहिलेंच आमंत्रण होय. निवृत्तिनाथांच्या कृपेनें श्राद्ध समयीं प्रत्यक्ष त्या ब्राह्मणाच्या वडिलांनीं त्यांस दर्शन देऊन भक्तीचा लाभ दिला. ही कीर्ति ऐकून हळू हळू दूर दूरच्या गांवांहून मंडळी ह्या भावंडांच्या दर्शनास येऊं लागली.

---

# पं. जवाहरलाल नेहरूंचें जन्मरहस्य

दत्ता मराठे

भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मासंबंधीं दिल्लीचें एक उर्दू पत्र 'शोशेर पंजाब' याच्या एका अंकामध्यें एक अत्यंत विस्मयजनक कथा प्रसिद्ध करण्यांत आली आहे. पं. मदनमोहन मालवीय यांनीं लिहिलेल्या एका पत्रामध्यें ही विलक्षण कथा वर्णन करण्यांत आली असून, हें पत्र उपलब्ध झालेलें आहे. पं. मालवीय यांनीं आपल्या त्या पत्रांत वर्णन केलेली हकीकत पुढील-प्रमाणें आहे :

एका वेळीं पं. मदनमोहन मालवीय, पं. दीनदयाळ शास्त्री आणि पं. मोतीलाल नेहरू हे तिघेजण हृषीकेशला गेले होते. सकाळ-संध्याकाळीं आसपासच्या पहाडां-मधून हिंडून तेथें आढळणाऱ्या योगी-जनांचें दर्शन घ्यायचें, असा तिघांनीं परिपाठ ठेवला होता. एक दिवशीं संध्याकाळीं हे तिघेजण फिरायला गेले असतांना एका झाडावर एक जटाधारी योगी समाधिस्थ असा बसलेला त्यांना आढळला. झाडाच्या अगदीं खालच्या डहाळीवर मातीचें एक भांडें बांधून लटकत ठेवलेलें त्यांना दिसलें. त्यांनीं आसपास चौकशी केली, तेव्हां त्यांना असें समजलें कीं, तो योगी सदैव झाडावरच रहातो, झाडावरच बसून ध्यानधारणा करतो, समाधि लावतो. पहांटे झाडाखालीं उतरून तो गंगास्नान करून येत असे आणि नंतर दिवसरात्र त्याच मुक्काम त्या झाडावरच असे. झाडाच्या त्या खालच्या डहाळीवर लटकावलेल्या भांड्यांत कोणी कांहीं खाण्याची वस्तु टाकली तर तेवढी खाऊन तो योगी निर्वाह करीत असे. भांड्यांत कोणी कधीं कांहींच टाकलें नाहीं तर तो यो आनंदानें उपाशी रहात असे !

ही हकीकत ऐकल्यावर या तिघ कुतूहल अत्यंत वाढलें. त्या योग दर्शन घ्यायचें त्यांनीं ठरवलें. दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून हे तिघेहि त्या योग्याचें दर्शन घेण्यासाठीं गेले. योगी त्या वेळीं तेथें नव्हता. तो स्नान करायला गेला होता. कांहीं वेळानें पाण्यानें भरलेला एक कमंडलू घेऊन तो योगी परत आला. तपश्चर्येनें त्या योग्याचें शरी कृश झालेलें असलें तरी, त्याच्या मुद्रेव अलौकिक तेज चमकत होतें. तो जव येतांच या तिघांनीं पटकन् उठून त्या आदरानें प्रणाम केला. योग्यानें त्यांच्या प्रणामांचा स्वीकार केला आणि विचारलें,

'काय पाहिजे तुम्हांला ?'

पं. मालवीयांनीं पं. मोतीलाल नेह यांच्याकडे बोट दाखवून म्हटलें—

## साभार स्वीकार

कराची येथील सौ. रखमाबाई गुरुजी या प्रेमळ माउलीनें घरोघरीं हिंडून श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां व कायम फंडाकरितां रु. ४९ वर्गणी जमविली हें मुद्दाम नमूद करण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें मद्रास रेल्वेवर गुंटकल शहराचे रहिवासी श्रीसाईभक्त श्रीयुत आत्माराम लाडोबा आरोळकर यांनीं एप्रिल महिन्यांत श्रीकायमफंडाकरितां रु. १५७–१२–० वर्गणी आपल्या तेथील मंडळीकडून जमविली हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. त्यांनीं श्रींच्या बागेसाठीं तरतऱ्हेचीं आंब्यांचीं कलमें पाठवून तीं या प्रदेशांत लागवडीस आणावीं हा त्यांचा एक अत्यंत प्रेम व उत्साहपूर्वक यत्न सदोदित चालू आहेच.

रा. आ. तखेड,

संपादक.

# श्रीशालिवाहन शके १८५५ श्रीमुखनाम संवत्सरे

## श्रीरामजयंतीच्या उत्सवाचा अहवाल

या सालीं आलेली जमा व झालेला खर्च याचा तपशीलवार खर्डा पोटीं आहे. यंदा नांदेड, मुखेड, गव्हाण, हिंगोली, माझोड, कळमनुरी, मुंबई, पुणें, आळंदी, बांद्रा, इंदोर, खामगांव, पंढरपूर, नगर, सोलापूर, बार्शि, गुंटकल, खुर्डुस, ठाणे, कल्याण, डहाणू, चिंचणी, तारापूर, सुरत, बडोदा, अहमदाबाद, कडूस, खेड, अकोला, भुसावळ वगैरे ठिकाणाहून बरेचसे लोक शिर्डीस साईमहाराजांच्या दर्शनास आले होते. नेहमीं येणारांपैकीं श्री. गोविंद शेटी महाजन व पापाळाल उमरीकर हे कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें येऊं शकले नाहींत.

उत्सवास आरंभ चैत्र शु० ८ पासून झाला व द्वादशीस काला होऊन रामनवमीच्या उत्सवाची समाप्ति झाली. या पांच दिवसांत मिळून ७-८ हजार पान झालें. बाहेर गांवाहून यात्रेच्या निमित्तानें सर्व प्रकारची मिळून ७५-८० दुकानें आली होतीं, या सालीं दुकानें थोडीं कमी आलीं होतीं. यात्रेचा बंदोबस्त सरकारचा तालुकाधिकारी यांनीं उत्तम ठेविला होता. राहत्याचे फौजदार व कोपरगांवचे मामलेदारसाहेब उभयतां हजर होते, त्यामुळें यात्रेंत चोऱ्या वगैरे कांहीं झाल्या नाहींत. पाणी पिण्याच्या विहिरींत सरकारकडून आलें औषध टाकण्यांत आलें होतें, त्यामुळें पाणी न बिघडतां व रोगराई कांहीं एक न होतां यात्रा निर्विघ्नपणें पार पडली.

उत्सवाच्या पांच दिवसांत बुंदी, शिरा, जिलबी अशीं पक्वान्नें मनमुराद झालीं. कोठीचा बंदोबस्त श्रीमारुती पत्तेवार, बाबा पत्तेवार, बाबू पारशेवार तिघानीं उत्तम ठेविला होता, तसेंच पंक्ति वाढण्याचा बंदोबस्त श्री. दिगंबरराव ऊर्फ नानासाहेब नांदेडकर—श्री. दिगंबरबुवा वसमतकर, श्री. जगंनाथराव हेड मास्तर राजुरी, श्री. भगवानराव माझोडकर, श्री. रामचंद्र यशवंत मराठे (विठ्ठलराव) श्री. दत्तोपंत कस्तुरे, श्री. नागोराव उंचेगांवकर, श्री. दत्तोपंत खामगांवकर, श्री. दादासाहेब वरुडकर, श्री. भगवानराव मांजरमकर श्री. सुभेदार, श्री. पुरुषोत्तम अशा मंडळींनीं चांगला ठेवल्यामुळें अन्नाची नासधूस झाली नाहीं. चैत्र शु० ११ चे दिवशीं गांवच्या व बाहेरगांवच्या तीनचार मुसलमान लोकांस त्यांच्या नेहमीच्या विहिरीपाशीं असलेल्या चिंचेखालच्या मशिदी पुढें यात्रा भरली असल्यामुळें श्रीसाईबाबांच्या द्वारकामाई नांवाच्या मशिदीच्या सभामंडपांत साखर शिऱ्याचें जेवण दिलें. त्या जेवणाचा बंदोबस्त मलीकभाई काशिमभाई, सयदूभाई, हमीदभाई वगैरे मुसलमान मंडळींनीं चांगला ठेवला.

श्रीरामनवमीच्या दिवशीं श्रीमहाराजांच्या समाधीजवळ असलेल्या पादुकांवर रुद्र, पवमानाचा अभिषेक पुणतांबे, पंढरपूर, काशी, कोकमठाणनम येथील भिक्षुकमंडळींनीं केला. दोनप्रहरीं श्रीरामजन्माचें किर्तन नेहमींप्रमाणें

ले. नंतर अस्तमानीं काठ्यांची व रथाची मिरवणूक निघाली. त्याचा बंदोबस्त श्री. तात्या पाटील, श्री. बयाजी पाटील, श्री. बामन पाटील, बापूरावनाना, . गबा सुतार यानीं उत्तम ठेविला होता. रात्रीं गांवच्या मुसलमान लोकांनीं ळ्ची मिरवणुक काढून महाराजांच्या समाधीस चंदन चढविलें; त्यानंतर मीप्रमाणें शोभेचें दारू सुटण्याचें काम प्रेक्षणीय झालें. चैत्र शु० १०च्या शीं मल्लांच्या कुस्त्याचा हगामा फार मोठा व प्रेक्षणीय भरला होता.कुस्त्याही गल्या झाल्या. हगाम्याचा बंदोबस्त श्री. तात्या पाटील कोते, श्री. बयाजी टील, श्री. रामचंद्र पाटील, श्र. दगडू सोनार, श्री. नारायण लव्हार, . नारायण शेळका, बाळा शिंपी वगैरे मंडळींनीं उत्तम ठेविला होता. हगा- ास बक्षिस वांटण्याकरितां श्रीसाईबाबांच्या पेटींतून जे पांच दिवसांत पैसे ले ते व कांहीं गांवकरी लोकांनीं वर्गणी करून दिले. संस्थानचे सेक्रेटरी . सुंदरराव दि. नवलकर यांनीं पत्रिका पाठविण्याचें काम उत्तम केलें. या ळीं खामगांवचे वकील श्री. बामन विठ्ठल दातार यांनीं दशमीच्या दिवशीं . भानुदास चरित्रावर उत्तम सुश्राव्य कीर्तन केलें तसेंच एकादशीच्या वशीं त्यांचे जोडीदार खामगांवचे ओक वकील यांनींही भरतभेट या चरित्रा- र सुश्राव्य उत्तम व आल्हाददायक कीर्तन केलें.एकादशीच्या दिवशीं रात्रीं च्या पालखीची मिरवणूक निघून भजन, गारुड वगैरे झालें. भजन करण्यास तुळठाणचे रा. अप्पा पाटील, रा. गंगाराम पाटील, देशपांडे, रा. शिरवल- र वगैरे मंडळींनीं चांगले अभंग व पदें म्हटलीं.

उत्सव झाल्यानंतर केवळ श्रींच्या प्रसादासाठीं म्हणून श्री. नानासाहेब ाडेनगर, श्रीमंत नानासाहेब मिरीकर, श्री. दाजीसाहेब मिरीकर, श्रीमंत बासाहेब मजुमदार, पुणें, श्रीमंत सरदार भाऊसाहेब विंचूरकर, श्रीमंत राज सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब पंतसचिव, भोर, श्रीमंतसाहेब सैंळनगर अशी मंडळी आली होती; या मंडळीबरोबर एक औंधचे . गजाननराव जोशी नांवाचे प्रख्यात फिडल वाजविणारे आले होते, मीही श्रीसाईमहाराजांपुढें हजरी दिली. तसेंच खानदेशांतील ह. भ. प.

विश्रामबुवा हेही आले होते; त्यांनी दोन दिवस श्रींपुढें हजेरी दिली. तशीच श्रीमंत भवानराव वनसुडे, मह्रू हेही आपल्या श्रीसाईमहाराजाच्या प्रसादानें झालेल्या मुलांचीं नांवे ठेवण्यासाठीं येथें आले. त्यांनी आपल्या मुलांचीं राम व कृष्ण अशी नांवें ठेविली; असो. परमेश्वर त्यांना व त्यांच्या मुलांबाळांस दीर्घायु करो. तसेंच रामनवमीच्या प्रसादासाठीं रावसाहेब डोंगरे पेन्शनर अ. कमिशनर अकोला व मांडवगणे हे उभयतां रामनवमी झाल्यावर येथें आले; व शेष प्रसाद उरला होता, तो सेवन करून समाधान मानलें. मी म्हटलें कीं, आतां रामनवमी झाली, आतां प्रसाद राहिला नाहीं. त्यावर रावसाहेब म्हणाले कीं, अजूनपर्यंत रामनवमीस उत्सवाकरितां खरेदी झालेलें सामान सरलें नाहीं, तेथपर्यंत मी हा रामनवमीचाच प्रसाद आहे असें समजतों. असें म्हणून दोनतीन दिवस राहून श्रींस अभिषेक व नैवेद्य करून परत गांवाकडे गेले.

येणेंप्रमाणें असलेली हकीकत श्रीचरणारविंदीं सादर केली आहे. चालू सालीं मुंबईच्या बाजूची वर्गणी श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड व श्री. सुंदरराव दि. नवलकर यांच्या साह्यानें बरीच आली व चालू सालीं खर्चही मागील सालापेक्षां जास्त झाला. सालोसाल आढावा पाहतां प्रत्येक उत्सव जमा-खर्चाच्या मानानें वाढत्या प्रमाणानें होत आहे. आलेल्या वडयावडया पाहुण्या राहुळ्यांचा श्री. बापूराव बोरावके, प्रे. जिल्हालोकलबोर्ड, नगर, यांनी आपल्या बागेंतील श्रीच्या तर्फे मोसंबी, चिकू, ऊस, रस वगैरे देऊन आदर-सत्कार केला. एकंदरींत चालू सालचा उत्सव श्रीच्या कृपेनें उत्तम तऱ्हेनें पार पडला. असो. ज्यांनीं ज्यांनीं द्रव्यद्वारा सहाय्य केलें, उत्सवास हजर राहून ज्यांनीं अंगमेहनत केली, कांहीं मंडळी उत्सव झाल्यावर उत्सवाच्या प्रसादा साठींच म्हणून आली, त्या सर्वत्र मंडळींचें त्यांच्या मुलांबाळांसह इभ्रतीचें व आरोग्याचें समर्थांनी कृपाकटाक्षानें अवलोकन करून रक्षण करावें. आम्ही सर्व मंडळी महाराजांची लेंकरें आहोंत; तेव्हां आमचें रक्षण करणें समर्थांकडे आहे. आमच्या हातून जाणून न जाणून विकारवश होऊन ज्या कांहीं चुका अगर अपराध झाले असतील त्यांची महाराजांनीं अत्यंत कृपाळु होऊन माफी

करावी, अशीच सर्वांच्या तर्फे आपल्या पवित्र चरणापाशीं नम्र विनंती करीत आहें. असो. अशीच सालोसाल दासाच्या हातून सेवा घेत जावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पुंडलीक वरदे हरि विठ्ठल ॥ सीताकांत:स्मरण जयजयराम ॥ पार्वतीपते हरहर महादेव ॥ श्रीसमर्थ रामदास ज्ञानेश्वर तुकाराम महाराजकी जय ॥ श्रीसद्गुरु साईबाबा वामनशास्त्रीमहाराज की जय ॥

सकल संताचा चरणरज

**दासगणु**

श्रीयुत संपादक श्रीसाईलीला,

सा. न. वि. वि. खालील श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळा-संबंधींचे नियम आपल्या वाचकमंडळीच्या माहितीकरितां प्रसिद्ध कराल अशी आशा करितों.

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळासंबंधींचे नियम:—

१ सदरील भक्तमंडळाचे तीन वर्ग केले जातील. ते येणेंप्रमाणें:—

(१) आश्रयदाते; (२) तहाहयात वर्गणीदार; (३) सामान्य वर्गणीदार.

२ ज्या भक्तांकडून ("भक्त" शब्दांत पुरुषभक्त व स्त्रीभक्त—दोहों-चाही समावेश होतो असें समजावें.) संस्थानच्या कायम फंडांत पांचशें रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा अथवा पोस्टाचीं कॅशसर्टिफिकिटें अथवा म्युनिसिपल बाँड अथवा पोर्टट्रस्ट बाँड आले असतील त्यांचा समावेश "आश्रयदाते" या वर्गांत होईल.

३ ज्या भक्तांकडून संस्थानच्या कायम फंडांत शंभर रुपये किंवा त्याहून अधिक (पण पांचशेंहून कमी) रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा

२८४